महाराष्ट्र शासन
माहितीचा अधिकार
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई**
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२९६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

**तातडीचे**

क्र.संवैशिवसं/बीपीएमटी/प्रवेश-२०१५/संस्था/२०१५/१-अ,     दिनांक - १९/०८/२०१५

प्रति,
अधिष्ठाता,
१. सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

**विषय : सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील बॅचलर ऑफ पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बी.पी.एम.टी.) अभ्यासक्रमाचे प्रवेश संस्थास्तरावर करणेबाबत...**

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता बॅचलर ऑफ पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बी.पी.एम.टी.) या अभ्यासक्रमाचे प्रवेश इयत्ता १२वी (विज्ञान शाखा) ची एच.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण ही पात्रता ठेवून संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविण्याची परवानगी या पत्राद्वारे देण्यात येत आहेत.

**बी.पी.एम.टी. च्या प्रवेशाकरिता आवश्यक असणारी पात्रता -**

१. उमेदवाराकडे भारताचे नागरिकत्व असणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराचा जन्म दिनांक ३१ डिसेंबर, १९९८ पूर्वी झालेला असावा.
३. उमेदवाराने १०वी आणि १२वी इयत्ता महाराष्ट्र राज्यातील संस्थांमधून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
४. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.
५. उमेदवाराने इयत्ता १२वी (विज्ञान शाखा) ही भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयातून उत्तीर्ण झालेला असावा.

बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमाचे प्रवेश संस्थांस्तरावर करण्याकरिता प्रत्येक संस्थेमार्फत प्रवेश प्रक्रियेबाबतची स्वतंत्र अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी. अधिसूचना प्रसिध्दी करण्याकरिता येणारा खर्च वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्वीय प्रपंची खात्यातून अदा करण्याच्या सूचना देण्यात येतील. प्रत्येक संस्थेतील बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमाचा विषयनिहाय आणि संवर्ग निहाय तक्ता संस्थास्तरावर समिती गठीत करुन तयार करण्यात यावा व त्याप्रमाणे गुणवत्तेनुसार प्रवेश प्रक्रिया राबवावी. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमाची प्रवेशाची अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ अशी राहील.

**संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

प्रत -
१. मा.अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ९वा मजला, गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना माहितीकरिता सविनय सादर.
२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.